आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांच्या आस्थापनेवरील
<u>अस्थायी पदांना मुदतवाढ देण्याबाबत...</u>
२०१८ - २०१९.

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग,
शासन निर्णय, क्रमांक : सकआ-२०१८/प्र.क्र.७३/आस्था २,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०००३२.
दिनांक :-२१.३. २०१८.

<u>वाचा</u> :- १) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र. सकआ-२०१७/२/ प्र.क्र.८१/ आस्था-२, दि.२९.१.२०१८
२) आयुक्त, समाज कल्याण, पुणे यांचे पत्र क्र.सकआ/आस्था-६/जिजाप्रप/अस्थायीपदे/१८-१९/का.६/ ६१५, दि.२०.२.२०१८.
३) शासन निर्णय, वित्त विभाग क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क., दि.५.३.२०१८.

शासन निर्णय :-

आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांच्या आस्थापनेवरील ६१७० अस्थायी पदांना दि.२८.२.२०१८ पर्यंत पुढे चालू ठेवण्यास संदर्भाधीन शासन निर्णय दि.२९.१.२०१८ अन्वये मंजूरी देण्यात आलेली आहे.

२. शासन निर्णय, वित्त विभाग दिनांक ५.३.२०१८ अन्वये प्रशासकीय विभागाच्या आकृतिबंधात समाविष्ट असलेल्या अस्थायी पदांना तसेच यापुर्वी आढावा मंजूर केल्यानंतर निर्माण करण्यात आलेल्या परंतु त्यांचा समावेश आकृतिबंधात करण्यात आलेला नाही, अशा अस्तित्वात असलेल्या सर्व अस्थायी पदांना दि.०१.०३.२०१८ ते दि.३०.०९.२०१८ पर्यंत मुदतवाढ देण्याचे अधिकार सर्व प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेले आहेत.

३. आयुक्त, समाजकल्याण यांच्या आस्थापनेवरील सोबतच्या विवरणपत्रे अ ते छ मध्ये दर्शविलेल्या एकूण ६१७० अस्थायी पदांना खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून दिनांक १ मार्च, २०१८ ते दि.३० सप्टेंबर, २०१८ या कालावधीकरीता पुढे चालू ठेवण्यास मान्यता देण्यात येत आहे -

१) कार्यकारी पदे वगळून अन्य अस्थायी पदे सहा महिन्यांपेक्षा अधिक काळ रिक्त नसल्याच्या धारणेच्या अधीन राहून सदर मुदतवाढ देण्यात येत आहे.
२) अस्थायी पदे ज्या कारणास्तव, ज्या अटी व शर्तीच्या अधीन राहून मंजूर केली आहेत, त्यांचे पालन करण्यात यावे.
३) अधिसंख्य पदावरील अधिकारी/कर्मचारी जसजसे इतरत्र पदावर ज्या दिनांकापासून सामावून घेतले जाईल त्या दिनांकापासून तसतशी अधिसंख्य पदे आपोआप रद्द होतील.

४. उपरोक्त पदांसाठी होणारा खर्च खालीलपैकी संबंधित लेखाशिर्षाखाली सन २०१८-१९ या वर्षी मंजूर करण्यात आलेल्या तरतूदीमधून भागविण्यात यावा -

१) २२२५-अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्गीयांचे कल्याण-
०१ - अनुसुचित जातींचे कल्याण ००१- संचालन व प्रशासन
(०१)(०१) सामाजिक न्याय संचालनालय (मागासवर्गीय शाखा)
(२२२५-००९-२) “ मागणी क्रमांक एन-३ ”

२) २२२५- अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती व इतर मागासवर्गीयांचे कल्याण
०१ - अनुसुचित जातींचे कल्याण ००१- संचालन व प्रशासन
(०३)(०१) नागरी हक्क संरक्षण कायदा अंमलबजावणीकरीता यंत्रणा
(२२२५-०१५-४) मागणी क्रमांक एन-३

३) २२२५- अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती व इतर मागासवर्गीयांचे कल्याण
०१ - अनुसुचित जातींचे कल्याण ००१- संचालन व प्रशासन
(०३)(०४) पंचवार्षिक योजना राज्य योजनेतंर्गत योजना
(०३)(०४) सामाजिक न्याय संचालनालय (मागासवर्ग शाखा)
(२२२५-३४७-६) (विघयो) “मागणी क्रमांक एन-३”

४) २२२५- अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती व इतर मागासवर्गीयांचे कल्याण
०१ - अनुसुचित जातींचे कल्याण, २७७ -शिक्षण
(०१)(०१)-अनुसुचित जातीतील मुले व मुली यांच्याकरिता असलेल्या शासकीय वसतीगृहाचे परिरक्षण (२२२५-०२८-१) - ०१ - वेतन मागणी क्रमांक एन-३

५) २२२५- अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती व इतर मागासवर्गीयांचे कल्याण
०३- मागासवर्गीयांचे कल्याण, २७७ - शिक्षण व इतर मागासवर्ग कल्याण वसतीगृहे
(०५)(०१) आर्थिकदृष्टया मागासलेल्या मुलामुलींसाठी वसतीगृहे सुरु करणे व त्यांची देखभाल करणे. (२२२५-०९१-३) - ०१ - वेतन

६) २२२५-सामाजिक सुरक्षा व कल्याण
२२२५-अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती व इतर मागासवर्गीयांचे कल्याण
०१ - अनुसुचित जातींचे कल्याण, ००१- संचालक व प्रशासन
(०१)(०२) अनुसुचित जातीकरीता असलेली विशेष घटक योजनांसाठी शाखा
(२२२५-०१०-९) मागणी क्रमांक एन-३

७) २२२५- अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती व इतर मागासवर्गीयांचे कल्याण
०१ - अनुसुचित जातींचे कल्याण, ००१- संचालक व प्रशासन
(०२) - जिल्हा परिषद व पंचायत समिती १८३ अधिनियम १९६१
(०२)(०१) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ यांच्या कलम १८३ अन्वये जिल्हा परिषदांना आस्थापना अनुदान (२२२५-०१३-६)
(स्थानिक क्षेत्र) (कोषागारात देय) मागणी क्रमांक एन-३

८) २२२५-अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती व इतर मागासवर्गीयांचे कल्याण
०१ - अनुसुचित जातींचे कल्याण, ००१- संचालक व प्रशासन
२७७ - शिक्षण पंचवार्षिक योजना राज्य योजनेतंर्गत योजना
(०३)(०४) पंचवार्षिक योजना राज्य योजनेतंर्गत योजना (विघयो)
(०१)(१३) अनुसुचित जातीतील मुले व मुली यांच्याकरिता शासकीय वसतीगृहाचे स्थापन करणे व त्यांचे परिरक्षण (२२२५-३३४-२) नवीन वसतिगृह, मागणी क्रमांक एन-३

९) २२२५-अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती व इतर मागासवर्गीयांचे कल्याण
०३ - मागासवर्गीयांचे कल्याण, ००१- संचालक व प्रशासन
(०१)(०१) विमुक्त जाती जमाती व इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण संचालनालय (२२२५-३१३-५)-०१ वेतन, मागणी क्रमांक एन-४

१०) २२२५-अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती व इतर मागासवर्गीयांचे कल्याण
०१ - अनुसुचित जातीचे कल्याण
२७७ शिक्षण पंचवार्षिक योजना राज्य योनेतंर्गत योजना (विघयो)
(०१)(१३) अनुसुचित जातीतील मुले व मुली यांच्याकरिता शासकीय वसतीगृहाचे स्थापन करणे व त्यांचे परिरक्षण (२२२५-३३४-२)-नवीन वसतिगृह मागणी क्रमांक एन-२

११) २२२५-अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती व इतर मागासवर्गीयांचे कल्याण
०१- अनुसुचित जातीचे कल्याण,
२७७ शिक्षण, राज्य योजनांतर्गत योजना
(१०)(०१) अनुसुचित जातीच्या मुले व मुलींसाठी नवीन शासकीय निवासीशाळा सुरु करणे (वि.घ.यो) (२२२५-डी - ११७) मागणी क्र. एन-३

१२) २२२५-अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती व इतर मागासवर्गीयांचे कल्याण
०१ - अनुसुचित जातींचे कल्याण, ००१- संचालक व प्रशासन,
(०३)(०४) सामाजिक न्याय संचालनालय (मागासवर्ग शाखा)
(२२२५-०११-८) मागणी क्र.एन ३

१३) २२२५-अनुसुचितजाती,अनुसुचित जमाती,इतर मागासवर्ग व अल्पसंख्यांक यांचे कल्याण
०१ - अनुसुचित जातींचे कल्याण,
७८९-अनुसूचित जाती घटक योजना,
०२-भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १२५ वी जयंती साजरी करणे.
(योजनांतर्गत) (दत्तमत)
(२२२५-डी-८२३) मागणी क्र.एन ३

३. प्रस्तुत शासन निर्णय, वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क., दि.५.३.२०१८ अन्वये प्रशासकिय विभागास प्रदान करण्यात आलेल्या प्राधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

४. प्रस्तुत शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०३२२१३०३५६७७२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Dnyandev Laxman Sul

Digitally signed by Dnyandev Laxman Sul
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a19e16d10b98348341561863c7561e9fc35bb428cdc3ea443c0263495f76285a, serialNumber=0a540933faf44a550ca357b423fa83e6fdce81a4746d167dae68daa29726d41d, cn=Dnyandev Laxman Sul
Date: 2018.03.22 13:07:48 +05'30'

(ज्ञा.ल. सुळ)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :-

१. आयुक्त, समाज कल्याण, पुणे
२. आयुक्त, अपंग कल्याण, पुणे
३. संचालक, विमुक्त जामी, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग आणि विशेष मागास प्रवर्ग कल्याण संचालनालय, पुणे
४. सर्व प्रादेशिक उपायुक्त,
५. सर्व सहाय्यक आयुक्त,
६. सर्व जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद,
७. महालेखापाल, महाराष्ट्र -१/२ (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता) मुंबई / नागपुर

८.अधिदान व लेखा अधिकारी,
९. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मंबई.
१०. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
११. वित्त विभाग, व्यय -१४/ अर्थसंकल्प-१९, मंत्रालय, मुंबई
१२. कक्ष अधिकारी (मावक /अर्थसंकल्प), सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१३. निवडनस्ती (३ प्रती) आस्था -२.